MHKO070004792003

**नियमित दिवाणी दावा क्र.०३/२००३ मधील नि.क्र.२२९ वर आदेश**
**(तुळजगोंडा पाटील, वगैरे –विरुध्द– दादासाहेब पाटील, वगैरे )**

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांचे असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील या दि.१६/०३/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.९ यांच्या वारसांचेवर सदरचा दावा राईट टू सुट सरव्हाईव्ह होत असल्याने सदर वारस अभिलेखावर घेणे अत्यावश्यक आहे. सदर दावेतील माहितगार वादी क्र.१ब आण्णासो तुळजगोंडा पाटील हे तुरुंगात असल्याने व अन्य वादींना कामाबाबत योग्य ती माहिती नसल्याने मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. दरम्यान कोवीड–१९ चे महामारीमुळे लॉकडाऊनमुळेही मुदतीत वारसांची माहिती घेता आली नाही. माहिती उपलब्ध होताच वादी यांनी सत्वर अर्ज दिला आहे. काम न चालवणे अगर काम लांबवणे असे मुळीच घडलेले नाही. करीता प्रतिवादी क्र.९ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला ७३८ दिवसांचा विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०३.** प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालवण्यात आला.

**०४.** वादी यांच्या तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील वादपत्र व कादगपत्रे पाहिली. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची साक्षांकित प्रत निशाणी क्र.२२७ वरील वर्णनयादीसोबत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील हे दि.१६/०३/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येते.

प्रतिवादी क्र.९ शांताबाई दिनांक १६/०३/२०२० रोजी मयत झाले तारखेपासून ९० दिवसांमध्ये वादी यांनी प्रतिवादी क्र.९ शांताबाई यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतू त्यांनी मृत्युतारखेपासून ९० दिवसांत वारस अभिलेखावर आणले नसल्यामुळे दि.१६/०६/२०२० रोजी प्रतिवादी क्र.९ शांताबाई यांचेविरुध्द प्रस्तुतचा दावा अबेट झाला व प्रस्तुतचा अर्ज जवळपास ७३८ दिवसांच्या विलंबाने म्हणजे दि.२१/०६/२०२२ रोजी वादी यांनी दाखल केला आहे.

**०५.** वादी यांना प्रतिवादी क्र.९ शांताबाई यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी ७३८ महिन्याचा विलंब झालेला दिसून येत आहे. वादी यांनी विलंबाचे दिलेले कारण योग्य व संयुक्तीक वाटत नाही. तसेच वादी यांनी कोवीड–१९ च्या महामारीमूळे लॉकडाऊन असल्यामुळे वारसांची माहिती घेता आली नाही असा बचाव घेतला आहे. परंतू ज्या प्रकरणांची किंवा अर्जाची मुदत दि.१५/०३/२०२० नंतर संपूष्टात येणार होती अशा प्रकरणांचा किंवा अर्जाच्या दाखल करणेच्या मुदतीस मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८/०२/२०२२ पर्यंत मुदतवाढ दिली होती परंतू त्यानंतरही त्यांनी ब–याच विलंबाने प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाखल केलेला आहे. यामध्ये त्यांचा हजगर्जीपणा आहे. परंतू प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचा महत्वपूर्ण हक्क नाकारल्यासारखे होईल. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले असतात. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते–

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज **र.रु.५००/–** खर्च वादी यांनी न्यायालयात भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2022.12.14 18:33:02 +0530

**( रोहिनी अ. जाधव )**

दि.१४/१२/२०२२.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
जयसिंगपूर.